राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in ४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/कार्यालयीन वेळ/२०२०/१०५८ दिनांक : 28 FEB 2020

**परिपत्रक :-**

संदर्भ : महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक समय-२०१६/प्र.क्र.६२/१८ (र.व का.), दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०.

संदर्भित शासन निर्णयान्वये दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० पासून शासकीय कार्यालयांसाठी (ज्या शासकीय कार्यालयांना ज्यांच्या सेवा अत्यावश्यक म्हणून समजल्या जातात, अशा कार्यालयांना व शासकीय महाविद्यालये, तंत्रनिकेतने, शाळा इत्यादी वगळून) पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात आलेला आहे. त्यामुळे सर्व शनिवार व रविवार हे सुट्टीचे दिवस असतील. त्या अनुषंगाने सदर पाच दिवसांचा आठवाडा या कार्यालयालाही लागू असल्यामुळे या कार्यालयाची कामकाजाची वेळ ४५ मिनीटांनी वाढविण्यात येत असून ती सोमवार ते शुक्रवार सकाळी ०९-४५ ते सायंकाळी ०६-१५ अशी राहील. तसेच या कार्यालयातील सर्व गट ड (चतुर्थ श्रेणी कर्मचारी) मधील कर्मचा-यांसाठी कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ०९-३० ते सायंकाळी ०६-३० अशी राहील.

उपरोक्त कार्यालयीन वेळेमध्ये दुपारी ०१.०० ते ०२.०० या वेळेमधील जास्तीत जास्त अर्ध्या तासाची भोजनाची सुट्टी अंतर्भूत असेल. भोजनासाठी अधिकारी / कर्मचारी अधिक वेळ घेणार नाहीत. तसेच एकाच शाखेतील सर्व अधिकारी / कर्मचारी एकाच वेळी भोजनासाठी जाणार नाहीत, याची सर्व अधिकारी / कर्मचा-यांची खबरदारी घ्यावी.

(डॉ. दि. रा. नदनवार).
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना :-
(१) ह्या कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी.
(२) ह्या कार्यालयातील प्रोग्रॅमर.
त्यांना कळविण्यात येते की, संदर्भित शासन निर्णयान्वये या कार्यालयाची कामकाजाची वेळ निश्चित करण्यात आलेली असल्यामुळे सदर कामकाजातील वेळेचा बदल हा या कार्यालयात बसविण्यात आलेल्या बायोमेट्रिक मशिनमध्ये करुन त्यानुसार या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांनी बोटांच्या ठशांच्याद्वारे नोदविलेल्या हजेरीबाबतचा अहवाल दरमहा आस्थापना विभाग ३ (अ) यांना उपलब्ध करुन देण्यात यावा.
(३) ह्या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संस्था प्रमुख.
(४) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे.
(सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर शासन निर्णय निर्गमित करताना दिनांक ३१/०८/१९८८ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आलेला आहे.)
(५) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचलानालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीकरिता सादर.